कोषागारातून रोख देय अनुदान
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी कव्हरेज या घटकाचे केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत.. लेखाशिर्ष-२२१५ ९७९१.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.राग्रापे-२०१७/प्र.क्र.७० (एलबी-१) /पापु-१०
जी.टी. रुग्णालय इमारत, ७ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक: २८.०३.२०१८

वाचा: (१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दि. १७.०३.२०१०.
(२) केंद्र शासनाचे पत्र क्र.डब्ल्यु-११०२०/१९७/२०१५-Water-I/१५०, दिनांक १५.०३.२०१८.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या अनुदानांतर्गत आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, ०२ जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (२५) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा) यासाठी अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९७९१) या लेखाशिर्षाखालील संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना कव्हरेज या सर्वसाधारण घटकासाठी (Normal Allocation) पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये नळ पाणी पुरवठा योजनांकरीता सर्वसाधारण योजनेंतर्गत २२१५ ९७९१ या लेखाशिर्षाखाली रु. ४०,३५,०७,५००/- (रुपये चाळीस कोटी पस्तीस लक्ष सात हजार पाचशे मात्र) एवढे अनुदान कव्हरेज या घटकासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या, विवरणपत्र-अ प्रमाणे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) पुढील अटींवर मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अटी:-

१) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी हे अनुदान राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या ५५५ भौतिकदृष्ट्या पूर्ण परंतू आर्थिकदृष्ट्या अपूर्ण गावे/वाड्यातील योजना पूर्ण करण्यासाठी खर्च करावयाचे आहे. अंमलबजावणी यंत्रणांनी सदर अनुदान खर्च करतांना फ्लोराईड/आर्सेनिकग्रस्त गावे/वाड्यामधील योजना, संसद आदर्श ग्राम योजनेमधील गावातील योजना, हागणदारीमुक्त गावातील योजना पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करण्यात यावे.

२) सदर अनुदान कव्हरेज या घटकाच्या निश्चित वार्षिक कृती आराखड्यात उपरोक्त घटकांसाठी समाविष्ट असलेल्या गावे/वाड्यामधील प्राथम्यक्रमानुसार येणाऱ्या गावे/वाड्यांमधील योजनांची कामे तसेच ज्या केंद्रीय सहाय्यित योजनांमध्ये शासन सहभाग सक्तीचा करण्यात आलेला आहे अशा भौतिक दृष्ट्या पुर्णत्वाकडे आलेल्या योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी प्राथम्याने खर्च करावयाचे आहे.

३) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत. या शासन निर्णयातील अटी व शर्तीची व NRDWP या योजनेंतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून पूर्तता होत आहे, याची शासनाला खात्री करून घेता यावी, यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना लेखा परीक्षणाकरिता संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहील. तसेच महालेखापाल यांना त्यांचे काम योग्यरितीने पार पाडता यावे म्हणून संबंधित अंमलबजावणी यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

४) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.आरसीएन-१८९/सी.आर.३०२७/ २८, दि. ०५/०९/९० मधील सुचनेप्रमाणे सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी विभागीय आयुक्त (विकास शाखा), यांना व कार्यासन पापु-१०/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर

करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर व पापु-१० कार्यासनास सादर करावे.

५) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कव्हरेज याखाली हाती घेतलेल्या योजनांसाठीचा खर्च हा ५०% केंद्र निधीतून व ५०% राज्य निधीतून करणे आवश्यक आहे.

६) केंद्र व राज्य हिश्श्यातून केलेल्या खर्चाची नोंद न चुकता,IMIS या प्रणालीवर पुढीलप्रमाणे नोंद घेण्यात यावी तसेच सदर नोंदी पुढीलप्रमाणे वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

   क. भौतिक दृष्ट्या १००% पूर्ण परंतु आर्थिक दृष्ट्या अपूर्ण योजना.

   ख. >७५ ते < १००% भौतिक दृष्ट्या पूर्ण.

   ग. <५० ते ७५%> भौतिक दृष्ट्या पूर्ण.

   घ. <२५ ते ५०%> भौतिक दृष्ट्या पूर्ण.

७) सर्वप्रथम, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी करण्यात आलेला सर्व खर्च प्रथम आयएमआयएस प्रणालीवर अद्यावत करण्यात यावा. जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देयक तयार असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी निधी मागणी असल्याने वितरीत करण्यात आलेला निधी सदर योजनांवरच खर्च करण्यात यावा. तसेच केंद्र हिश्यांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी पाणी पुरवठा योजनांना वितरीत करतांना केंद्र शासनाच्या आयएमआयएस संकेतस्थळावर खर्चाची नोंद होत असल्याची खात्री करण्यात यावी.

८) सदर निधी सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ आणि २०१७-१८ या वर्षाच्या कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या योजनांसाठीच खर्च करावा. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेला निधी उपयोगात आणण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून खर्चाचे नियोजन करावे व उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळीच सादर करावीत.

९) सदर रक्कम त्वरित आहरीत करण्यात यावी.

२. यावर होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, ०२ जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (२५) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा) यासाठी अनुदाने, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)(२२१५ ९७९१) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ३०.०६.२०१७ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर प्रकरणी वित्त विभाग परिपत्रक दिनांक १८.०४.२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता होत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३२८१०००००८६९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.28 10:01:56 +05'30'

(दिलीप पां. पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)

३. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)

४. नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग(व्यय-३), मंत्रालय, मुंबई.

५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद,
८. जालना, लातूर, नागपूर, सांगली, बुलढाणा, गोंदिया, रत्नागिरी, सातारा, परभणी, पुणे, ठाणे, जळगांव,
९. अमरावती,नंदूरबार, नाशिक, उस्मानाबाद, वाशिम.
१०. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, अहमदनगर,
१२. औरंगाबाद, जालना, लातूर, नागपूर, सांगली, बुलढाणा, गोंदिया, रत्नागिरी, सातारा, परभणी, पुणे, ठाणे,
१३. जळगांव, अमरावती,नंदूरबार, नाशिक, उस्मानाबाद, वाशिम.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद,
१५. जालना, लातूर, नागपूर, सांगली, बुलढाणा, गोंदिया, रत्नागिरी, सातारा, परभणी, पुणे, ठाणे, जळगांव,
१६. अमरावती,नंदूरबार, नाशिक, उस्मानाबाद, वाशिम.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
१९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.४, पा.पु. २०

विवरणपत्र-अ

अ.क्र.	अंमलबजावणी यंत्रणेचे नाव	घटक	वितरीत रक्कम
शासन निर्णय , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. राग्रापे-२०१७/प्र.क्र.७०(एलबी-१)/पापु-१०, दिनांक: २८.०३.२०१८			
ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधी वितरण (केंद्र हिस्सा) (सर्वसाधारण घटक) लेखाशिर्ष-२२१५ ९७९१ (रुपये लाखात)			
१	रायगड	कव्हरेज	५०.००००
२	सिंधुदुर्ग	कव्हरेज	५०.००००
३	कोल्हापूर	कव्हरेज	५०.००००
४	अहमदनगर	कव्हरेज	५०.००००
५	औरंगाबाद	कव्हरेज	५०.००००
६	जालना	कव्हरेज	९००.००००
७	लातूर	कव्हरेज	४००.००००
८	नागपूर	कव्हरेज	१००.००००
९	सांगली	कव्हरेज	१००.००००
१०	बुलढाणा	कव्हरेज	४००.००००
११	गोंदिया	कव्हरेज	१००.००००
१२	रत्नागिरी	कव्हरेज	५००.००००
१३	सातारा	कव्हरेज	१००.००००
१४	परभणी	कव्हरेज	१००.००००
१५	पूणे	कव्हरेज	१००.००००
१६	ठाणे	कव्हरेज	१००.००००
१७	जळगाव	कव्हरेज	४००.००००
१८	अमरावती	कव्हरेज	१००.००००

१९	नंदूरबार	कव्हरेज	३९.३६००
२०	नाशिक	कव्हरेज	१४५.७१५०
२१	उस्मानाबाद	कव्हरेज	१००.००००
२२	वाशिम	कव्हरेज	१००.००००
	(एकूण वितरीत रक्कम रु. चाळीस कोटी पस्तीस लक्ष सात हजार पाचशे मात्र)		४०,३५,०७,५००

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.28 10:02:12 +05'30'

(दिलीप पां. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन